# सहसंचालक तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, मुंबई

जागतिक बँक प्रकल्पांतर्गत इमारत, पहिला मजला, शासकीय तंत्रनिकेतन परिसर,
४९, खेरवाडी, अलियावार जंग मार्ग, वांद्रे(पूर्व), मुंबई ५१.
फोन नं.२६४७ ४८९२ टेलीफॅक्स नं.२६४७ १६१९

ई-मेल-*romumbai@dtemaharashtra.gov.in* *website – www.jdteromumbai.com*

परिपत्रक

**अत्यंत महत्वाचे**

क्र. २/विकामुं/तंशि/इबीसी/२०१७/ १८१६

दिनांक : 20 JUN 2017

प्रति,
सर्व Facilitation Centers व
ARC Centers (Admission Reporting Center)

विषय : शैक्षणिक वर्ष २०१७-१८ मध्ये प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांना योजनांची माहिती करुन देणेबाबत
संदर्भ : मा. संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, म.रा., मुंबई यांचे पत्र क्र. १८/तंशिसं/ईबीसी/२०१७/८२, दि.९/६/२०१७

संदर्भीय विषयानुसार सर्व Facilitation Center व ARC Center (Admission Reporting Center) असलेल्या संस्थांना सूचित करण्यांत येते की, व्यावसायिक अभ्यासक्रमासाठी शैक्षणिक वर्ष २०१७-१८ मध्ये प्रवेश घेणाऱ्या आर्थिकदृष्ट्या मागास विद्यार्थ्यांसाठी **"राजर्षी छत्रपती शाहू महाराज शिक्षण शुल्क शिष्यवृत्ती योजना"** व **"डॉ. पंजाबराव देशमुख वसतीगृह निर्वाह भत्ता योजना"** या दोन योजनांची सोबत जोडलेली माहिती सर्व FC व ARC संस्थांनी संस्थेच्या इमारतीच्या दर्शनी जागेवर सर्व भेट देणाऱ्या विद्यार्थी व पालकांना सहजपणे दिसेल अशा ठळक स्वरुपात लावावी. जेणेकरुन ह्या योजनांचा लाभ सर्वाना माहिती होईल.

सहपत्रे : वरीलप्रमाणे

(प्रमोद अ. नाईक)
सहसंचालक
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, मुंबई

# महाराष्ट्र शासन
# उच्च व तंत्रशिक्षण विभाग

## ➢ राजर्षी छत्रपती शाहू महाराज शिक्षण शुल्क शिष्यवृत्ती योजना :-

- मान्यता प्राप्त संस्थांमध्ये पात्र व्यावसायिक अभ्यासक्रमांत प्रवेश घेणारे आर्थिकदृष्टया दुर्बल घटकातील विद्यार्थी केवळ निधी अभावी व्यावसायिक अभ्यासक्रमांपासून वंचित राहू नयेत म्हणून, एक सामाजिक बांधिलकी व घटनात्मक उत्तरदायित्व म्हणून महाराष्ट्र शासनाचा धोरणात्मक निर्णय.
- शासन निर्णय, उच्च व तंत्रशिक्षण विभाग, दि. १३ ऑक्टोबर, २०१६ अन्वये मान्यता प्राप्त व्यावसायिक व उच्च शिक्षण अभ्यासक्रमात शिकणा-या आर्थिकदृष्टया दुर्बल घटकातील विद्यार्थ्यांना राज्य शिक्षण शुल्क योजनेंतर्गत ज्यांच्या पालकांचे वार्षिक उत्पन्न रुपये ६.०० लाखापेक्षा कमी आहे अशा विद्यार्थ्यांनी व्यावसायिक अभ्यासक्रमांसाठी केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेतून घेतल्यास त्यांना शैक्षणिक शुल्काच्या ५० % शिष्यवृत्ती म्हणून अदा करण्यात येईल.
- शैक्षणिक वर्ष २०१७-१८ पासून ही रक्कम विद्यार्थ्यांच्या आधार संलंग्नित बँक खात्यामध्ये शिष्यवृत्ती स्वरुपात जमा करण्यात येईल.
- पालकांचे वार्षिक उत्पन्न मर्यादा :-
  अ) रु.२.५० लाख व त्यापेक्षा कमी वार्षिक उत्पन्न आहे अशा विद्यार्थ्यांसाठी पात्रता परीक्षेतील (दहावी/बारावी) गुणांच्या टक्क्यांची अट लागू नाही.
  ब) रु.२.५० लाखापेक्षा अधिक ते रु.६.०० लाखा पर्यंत वार्षिक उत्पन्न आहे अशा विद्यार्थ्यांसाठी पात्रता परीक्षेतील (दहावी/बारावी) गुण ६० टक्के किंवा त्यापेक्षा जास्त असणे आवश्यक.

## ➢ डॉ. पंजाबराव देशमुख वसतिगृह निर्वाह भत्ता योजना :-

- दि. १३ ऑक्टोबर, २०१६ च्या शासन निर्णयाद्वारे डॉ. पंजाबराव देशमुख वसतिगृह निर्वाह भत्ता योजना शैक्षणिक वर्ष २०१६-१७ पासून सुरु करण्यात आली असून राज्यातील अल्पभूधारक शेतकरी व नोंदणीकृत मजूर यांच्या महानगरातील संस्थांमध्ये शिक्षण घेणा-या पाल्यांना प्रतिवर्ष रु.३०,०००/- व इतर ठिकाणी शिक्षण घेणा-या विद्यार्थ्यांना रु.२०,०००/- इतका वसतिगृह निर्वाह भत्ता आधार संलंग्नित बँक खात्यामध्ये जमा करण्यात येईल.

❖ टिपः- योजने बाबतची पात्रता तंत्र शिक्षण संचालनालयाच्या संकेत स्थळ- www.dtemaharashtra.gov.in वर उपलब्ध.